महाराष्ट्र शासन

क्रमांक-शाशिम-११०८/(प्र.क्र.३५८/०८)/क्रीयुसे-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२९ ऑक्टोबर,२००८.

प्रति,
सचिव,
सरदार पटेल विद्यामंदिर,
खातेश्वर नगर,वाघापूर रोड,
यवतमाळ-४४५ ००१.

विषय :- शैक्षणिक सत्र सन २००८-०९ पासून एम.पी.एड्. हा अभ्यासक्रम सुरु करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ चे कलम ८२ (५) नुसार परवानगीबाबत.

संदर्भ :- १) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद,पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाल यांचे सलंग्नता आदेश क्रमांक-डब्ल्यूआरसी/५-६/१०२/२/(II)/२००८/३१८१०,दिनांक २८ मार्च,२००८.

२) आपले पत्र दिनांक १९ जून,२००८.

३) उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा,अमरावती विभाग यांचा अहवाल क्रमांक-अपसंअम/७५४/२००८, दिनांक २१ जून,२००८.

४) उप कुलसचिव (म.वि.),संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे पत्र क्रमांक-संगाबाअवि/८/सी-२५७/२००८, दिनांक ०५ ऑगस्ट,२००८.

विषयांकित प्रकरणी आपल्या संस्थेव्दारा संचलित डायभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय,यवतमाळ येथे एम.पी.एड्. हा व्दिवर्षीय अभ्यासक्रम ३० विद्यार्थी क्षमतेसाठी सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तीवर शासनाची मान्यता देण्यात येत आहे. :-

१) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद यांचे संदर्भिय आदेश व यापुढील काळात वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश याची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

F:\Nilam\Letter\letter\Spot-2355-08.wp

२) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडील अटी व शर्तींची पूर्तता संस्थेने करावी.

(३) संचालक,क्रीडा व युवक सेवा किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांना अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने संस्थेची पाहणी करणे, सूचना निर्गमित करणे व सूचनांचे पालन न झाल्यास योग्य कार्यवाही करणे याचे अधिकार रहातील.

(सतिश जोंधळे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीस्तव-

१) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे.

२) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा,अमरावती.

३) उप कुलसचिव (म.वि.),संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

४) जिल्हा क्रीडा अधिकारी,अमरावती

५) निवड नस्ती (क्रीयुसे-२)